महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, छत्रपती संभाजीनगर – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
Email Id: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र: विकाछसं/शिक्षण/२०२३/ 3712 दिनांक :- 25/10/2023

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित
पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था,
छत्रपती संभाजीनगर.

**विषय : - शैक्षणिक वर्ष २०२३ - २४ करिता संस्थांनी महाडीबीटी पोर्टलवरील संस्थेची माहिती (Institute Profile) अद्ययावत करण्याबाबत ....**

संदर्भ : १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२३-२४/२४२, दि. २०/१०/२०२३.

सन २०१८-१९ या वर्षापासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांकरिता बनविण्यात आलेल्या महाडीबीटी पोर्टलद्वारे (संकेतस्थळ- https://mahadbt.maharashtra.gov.in) तंत्रशिक्षण संचालनालयाकडून खालील योजना राबविण्यात येतात.

अ. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
ब. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना
क. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता, महाडीबीटी पोर्टल नोंदणीकृत असणाऱ्या (Registered Institute) संस्थांना, संस्थांची माहिती (Institute Profile) अद्ययावत करण्यासाठी डीबीटी पोर्टल दि. ०३/१०/२०२३ पासून महाआयटी यांचेकडून सुरु करण्यात आलेले असून सोबत महाआयटी यांच्या संदर्भीय ईमेलची प्रत जोडली आहे, त्याचे अवलोकन करावे. तसेच, याबाबत या कार्यालयाच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना खालीलप्रमाणे सुचित करण्यात येते.

1. सर्व संस्थांनी, डीबीटी पोर्टलचा लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन संस्था माहिती अंतर्गत (Institute Profile) असलेली सर्व माहिती जसे शैक्षणिक शुल्क, अभ्यासक्रमाचा तपशील इत्यादी (For example: Fee details, Course Details etc.) अचूक भरुन पुढील कार्यवाहीसाठी पाठवावी.

2. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून, महाआयटीच्या ईमेलमध्ये नमूद केल्याप्रमाणे, या विभागातील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या सर्व संस्थांसाठी नमूद केल्याप्रमाणे

**** For professional unaided courses approved by the Fee Regulating Authority (FRA), starting from the new academic year 2023-2024, institutes will no longer be required to manually input Tuition Fee and Development Fee details. Instead, these details will be automatically retrieved through API integration.) ही बाब फक्त विभागातील पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थांसाठी लागु राहील.**

3. संस्थांनी, सदर माहिती सक्षम प्राधिकरणाकडून मंजूर करुन घ्यावी, जेणेकरुन डीबीटी पोर्टलवर संस्थांना त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले, विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणी करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविता येतील. [तसेच, शैक्षणिक शुल्क मंजूरी प्रलंबित (Fees Not Approved) या कारणास्तव जर संस्थांना विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणी करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविता आले नाही तर याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुख यांची राहील याची नोंद घ्यावी. ]

4. डीबीटी पोर्टलवर संस्थेकडून भरण्यात आलेले व मंजूरीसाठी पाठविण्यात आलेले वर्षनिहाय शुल्क डीबीटी पोर्टलवर एकदा मंजूर करण्यात आले तर ते दुरुस्त करता येणार नाही व मंजूर झालेल्या शुल्कानुसार त्या त्या संबंधित योजनांचा लागू असलेला लाभ देण्यात येतो या कारणास्तव डीबीटी पोर्टलवर संस्थांनी घटकनिहाय शुल्क अचूक भरुन मंजूरीसाठी पाठवावे याची संस्थांनी नोंद घ्यावी.

5. आपल्या संस्थेच्या Institute Login मध्ये शैक्षणिक वर्ष 2021-22 व 2022-23 साठीचे विद्यार्थ्यांचे, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना तसेच उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना या योजनांतर्गतचे एकही अर्ज Institute Login मध्ये अथवा sent back to applicant मध्ये प्रलंबित नाहीत, याची दक्षता घ्यावी. जर अर्ज प्रलंबित राहिल्यास संस्थेचे शैक्षणिक वर्ष 2023-24 करीताचे शुल्कास महाडीबीटी पोर्टलवर मान्यता दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

त्याअनुषंगाने या कार्यालयाच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची माहिती बिनचुकपणे भरण्यात यावी. सदर प्रक्रियेची तपासणी प्राचार्यांनी स्वत: व्यक्तीश: करावी. तसेच वरील माहिती भरल्याचे व सोबत शैक्षणिक वर्ष 2023-24 करीता मान्यता मिळालेले (FRA) शैक्षणिक शुल्क व विकास शुल्क बाबतचे पत्र आणि शैक्षणिक वर्ष 2021-22 व 2022-23 साठीचे 1) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, 2) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना तसेच 3) उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना चे Dash Board Report जोडून या कार्यालयास मंजुरीस्तव सादर करण्यात यावा.

महाडीबीटी पोर्टलवर संस्थेने भरलेल्या माहितीमध्ये अथवा शुल्कांमध्ये काही तफावत आढळून आल्यास व ती मंजूर झाल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेच्या प्राचार्यांची राहील, याची नोंद घ्यावी.

(उमेश नागदेवे)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

प्रत: 1. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.